
महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

Lokneta News - लोकनेता न्युज

मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




बुधवार १७ जून २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २९६ किंमत २ रुपये 7499615933

# पहिलं बोगस कुणबी प्रमाणपत्र सापडलं: नगरसेवक पद जाणार?

## दौंडमधील नगरसेवक रोहित पाटील यांचे कुणबी प्रमाणपत्र पुणे जिल्हा जात पडताळणी समितीने रद्द केले आहे.

**लोकनेता न्युज नेटवर्क**

पुणे जिल्ह्यातील दौंडमधून मोठी बातमी समोर आली आहे. दौंडमध्ये पहिलं बोगस कुणबी प्रमाणपत्र सापडण्याचे समोर आले आहे. रोहित पाटील नावाच्या नगरसेवकाचे प्रमाणपत्र बोगस असल्याचा निर्णय पुणे जिल्हा जाती प्रमाणपत्र समितीने दिला आहे. त्यामुळे दौंड नगरपरिषदेत ओबीसी प्रमाणपत्रावर निवडून आलेल्या पाटील यांना मोठा धक्का बसला आहे. आता त्यांच नगरसेवक पदही धोक्यात आले आहे. हे संपूर्ण प्रकरण नेमकं काय आहे ते सविस्तर जाणून घेऊयात. रोहित पाटील यांचे कुणबी प्रमाणपत्र रद्द

समोर आलेल्या माहितीनुसार रोहित पाटील यांनी ओबीसीसाठी राखीव असणाऱ्या जागेवरून विजय मिळवला होता. मात्र त्यांच्या कुणबी प्रमाणपत्रावर आक्षेप घेण्यात आला होता. याबाबत बोलताना वकील मंगेश ससाणे यांनी सांगितले की, आज जात पडताळणी समितीने रोहित पाटील यांचे कुणबी प्रमाणपत्र रद्द केले आहे. या प्रमाणपत्राविरोधात अनेकांनी आक्षेप घेतला होता, त्यानंतर ही पडताळणी करण्यात आली. !रक्ताचे नाते नाही अशी कागदपत्रे दिली मंगेश ससाणे यांनी म्हटले की, 'रोहित पाटील यांनी कुणबी प्रमाणपत्र घेण्यासाठी ज्या लोकांशी रक्ताचे नाते नाही अशा नातेवाईकांचे दाखले दिले होते. या सर्व प्रकारावर आम्ही हरकत घेतली होती. याबाबत अनेक सुनावण्या झाल्या.

आज शेवटची सुणावणी जवळपास साडेपाच तास चालली. यात आम्ही अडीच तास युक्तिवाद केला. समोरील व्यक्तीने एकाच प्रकरणात प्रतिज्ञापत्रावर ॲफिडेविट देऊन दोन वेगवेगळ्या वंशावळी दिल्या होत्या.' खोटी माहिती दिली पुढे बोलताना ससाणे म्हणाले की, 'ज्या लोकांचा त्यांच्या पूर्वजांशी संबंध नाही अशा लोकांच्या कुणबी नोंदींचा पुरावा आपल्या प्रकरणात दाखल केला होता. याच प्रकरणात त्यांनी परस्पर विरोधी शैक्षणिक माहिती दिली होती. हे सगळं आम्ही समितीच्या समोर आणलं. यावर समिनीने निर्णय घेताना ओबीसींना न्याय दिला असं आम्हाला वाटतं. राज्यातील इतरही ठिकाणी अशाच प्रकारची प्रमाणपत्र दिले गेल्याची शंका आहे. या प्रकरणाचीही चौकशी व्हावी.'




### खऱ्या नोंदी असणाऱ्यांनाच प्रमाणपत्र द्याव...

शेवटी ससाणे म्हणाले की, 'याच समितीकडे पुणे महापालिका, पिंपरी चिंचवड महापालिकेसह जिल्हातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रमाणपत्रांच्या सुनावण्या झालेल्या आहेत. आम्ही आशा करतो की सदरची जात पडताळणी मेरिटवर निर्णय देईल अशी आशा आहे. ज्याच्या खऱ्या नोंदी असतील त्यांनाच प्रमाणपत्र दिले जाईल अशी आशा आहे.'

## शहरात दहशत माजवणाऱ्या मंगळसूत्र चोरांचा खेळ खल्लास, शहर गुन्हे शाखेची कारवाई

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

छ.संभाजीनगर,दि.१५ :छत्रपती संभाजीनगर शहरात महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्रांवर डल्ला मारणाऱ्या सराईत चोरट्यांच्या टोळीला अखेर गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या.मंगेश शहाणे,अमोल गलाटे,अल्ताफ शेख आणि शेख सिराजुल हक यांना अटक करत पोलिसांनी तब्बल ९ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मॉर्निंग वॉक करणाऱ्या




महिलांना लक्ष्य करून चाकूचा धाक दाखवत मंगळसूत्र हिसकावणाऱ्या या टोळीने शहरात अक्षरशः दहशत माजवली होती. पोलिसांच्या कसून चौकशीत आरोपींनी

## १४.५८ लाखांचा अवैध दारूसाठा रोड रोलरखाली चिरडला; पोंभूर्णा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**लोकनेता न्युज नेटवर्क**

चंद्रपूर / सिद्धेश्वर केंद्रे

पोंभूर्णा पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्तरित्या मोठी कारवाई करत मागील सहा वर्षांत विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेला तब्बल १४ लाख ५८ हजार ५१० रुपयांचा अवैध दारूसाठा नष्ट केला. पोंभूर्णा पोलीस ठाण्यासमोरील सिमेंट रस्त्यावर दारूच्या बाटल्यांवर रोड रोलर फिरवून हा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. पोंभूर्णा पोलीस ठाण्यात वर्ष २०२० ते २०२६ या कालावधीत नोंद झालेल्या एकूण ८५ गुन्ह्यांमधील जप्त दारूसाठ्यात ३९४



पेट्या व ११ किरकोळ देशी दारूच्या बाटल्या तसेच ५ पेट्या व ६ किरकोळ विदेशी दारूच्या बाटल्यांचा समावेश होता. या मुद्देमालाची एकूण किंमत १४ लाख ५८ हजार ५१० रुपये इतकी होती. राज्य उत्पादन शुल्क विभाग, चंद्रपूर यांच्या कार्यालयीन आदेशानुसार जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्यास परवानगी मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. यावेळी पोलीस ठाण्यासमोरील मुख्य सिमेंट रस्त्यावर सर्व दारूच्या बाटल्या ठेवण्यात आल्या व त्यावर रोड रोलर फिरवून त्या नष्ट करण्यात आल्या. त्यानंतर फुटलेल्या काचेचा चुरा व रिकाम्या बाटल्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मोठ्या खड्ड्यात गाडून विल्हेवाट लावण्यात आली. ही प्रक्रिया पोंभूर्णा पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक राहुल ठेंगणे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक एस. टी. धीडसे, पोलीस कर्मचारी तसेच अधिकृत पंच यांच्या उपस्थितीत पार पडली. संपूर्ण कारवाईचा विधिवत पंचनामा करण्यात आला असून पारदर्शकता राखण्यासाठी व्हिडिओ चित्रीकरण व छायाचित्रणही करण्यात आले. तसेच या कारवाईची नोंद पोंभूर्णा पोलीस ठाण्याच्या स्टेशन डायरीमध्ये करण्यात आली आहे. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि मुल उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO) सत्यजित आमले यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार राहुल ठेंगणे व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## चिमुरड्यांच्या स्वागतासाठी हवेत उडाले फुगे!



**लोकनेता न्युज नेटवर्क**

इंदापूर ता. प्रति:- राहुल जाधव

इंदापूर: नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ चा पहिला दिवस शेळगाव आणि परिसरातील सर्व शाळांमध्ये मोठ्या उत्साहात साजरा झाला. १५ जून रोजी शाळेच्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिली आणि अंगणवाडीत नव्याने दाखल झालेल्या चिमुकल्यांचे शाळांमध्ये आगमन झाले. यावेळी शिक्षकांनी आणि ग्रामस्थांनी नवीन विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण केले. त्यांना गुलाब पुष्प देऊन आणि हवेत रंगीबेरंगी फुगे सोडून त्यांचे स्वागत करण्यात आले, ज्यामुळे बालकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. शेळगाव येथील केंद्र शाळेसह परिसरातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये हा 'प्रवेशोत्सव' मोठ्या थाटामाटात पार पडला.या उत्साही सोहळ्याला माजी सरपंच रामदास शिगाडे, ग्रामपंचायत सदस्य मोहन खराडे, माजी प्राचार्य मच्छिंद्र बनसोडे आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमजान सय्यद उपस्थित होते. तसेच समिती सदस्य पंकज भोंग , मुख्याध्यापक सयाजी येवले, शिक्षिका निता यशवंत माने, शिक्षक उमेश सुपुते, अण्णा कराळे,आशा मोहिते आणि शुक्रिया सय्यद यांच्यासह अनेक ग्रामस्थ, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेटिना शस्त्रक्रियेतील विश्वासार्ह नाव : डॉ. स्वप्नील डोणगावकर यांचे नेत्रसेवेत उल्लेखनीय योगदान

### आधुनिक तंत्रज्ञान, अचूक निदान आणि यशस्वी शस्त्रक्रियांच्या माध्यमातून हजारो रुग्णांना दिली नवी दृष्टी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

पाचोड | त्रिसिंग जायभाये

छत्रपती संभाजीनगर : डोळे हे मानवी शरीरातील अत्यंत महत्त्वाचे आणि नाजूक अवयव मानले जातात. दृष्टी गमावणे ही व्यक्तीच्या जीवनातील मोठी समस्या ठरू शकते. अशा परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णांना नवी दृष्टी आणि आशेचा किरण देणारे नेत्ररोगतज्ज्ञ म्हणून डॉ. स्वप्नील डोणगावकर (DNB, FRCS) यांचे नाव आज विशेष आदराने घेतले जाते. Vitreo Retinal Surgeon आणि Consulting Ophthalmologist म्हणून त्यांनी नेत्रोपचार क्षेत्रात भरीव कार्य केले असून हजारो रुग्णांना यशस्वी उपचारांचा लाभ मिळवून दिला आहे. रेटिना हा डोळ्याचा अत्यंत महत्त्वाचा भाग असून त्यासंबंधित आजारांचे निदान आणि उपचार हे अत्यंत कौशल्याचे काम मानले जाते. रेटिनल डिटॅचमेंट, डायबेटिक रेटिनोपॅथी, मॅक्युलर



डिसीज, डोळ्यातील रक्तस्राव यांसारख्या गंभीर आजारांवर उपचार करण्यात डॉ. डोणगावकर यांना विशेष प्राविण्य आहे. अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने ते रुग्णांचे अचूक निदान करून योग्य उपचारपद्धती अवलंबतात.

देशातील नामांकित संस्थांमधून उच्च शिक्षण घेतलेल्या डॉ. डोणगावकर यांनी नेत्रविज्ञान क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात केले आहे. विशेषतः रेटिना शस्त्रक्रिया आणि लेसर उपचारामध्ये त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ केवळ छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यालाच नव्हे, तर मराठवाड्यासह राज्यातील विविध भागांतील रुग्णांनाही होत आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे मधुमेहाचे प्रमाण वाढत आहे. मधुमेहामुळे डोळ्यांवर होणारे दुष्परिणाम वेळेवर ओळखले नाहीत तर कायमस्वरूपी दृष्टी गमावण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. अशा रुग्णांसाठी डॉ. डोणगावकर यांची विशेष सेवा लाभदायक ठरत आहे. डायबेटिक रेटिनोपॅथीचे वेळेवर निदान आणि उपचार करून अनेक रुग्णांची दृष्टी वाचविण्यात त्यांनी यश मिळवले आहे.

रुग्णांशी आत्मीयतेने संवाद साधणे, त्यांच्या शंकांचे निरसन करणे आणि उपचार प्रक्रियेची सविस्तर माहिती देणे ही त्यांच्या वैद्यकीय सेवांची विशेष ओळख आहे. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे. अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्याने नेत्रोपचार क्षेत्रात त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

नेत्ररोगांविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी वेळोवेळी विविध उपक्रम, तपासणी शिबिरे आणि आरोग्यविषयक मार्गदर्शनाच्या माध्यमातूनही ते सामाजिक बांधिलकी जपत आहेत. आधुनिक आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा प्रयत्न समाजासाठी प्रेरणादायी मानला जात आहे.

अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा, दर्जेदार उपचारपद्धती आणि रुग्णसेवेची तळमळ यामुळे डॉ. स्वप्नील डोणगावकर हे नेत्रोपचार क्षेत्रातील विश्वासार्ह नाव बनले असून त्यांच्या कार्याची दखल वैद्यकीय क्षेत्रासह समाजातील विविध स्तरांतून घेतली जात आहे. हजारो रुग्णांना नव्या दृष्टीचा प्रकाश देणारे हे कार्य भविष्यातही अनेकांसाठी आशेचा किरण ठरणार आहे.

# घरफोडीच्या गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत छडा; तेलंगणातून आरोपी अटकेत!

**लोकनेते न्यूज नेटवर्क**

चंद्रपूर | सिद्धेश्वर केंद्रे

जिल्ह्यातील लाठी पोलीस स्टेशन हद्दीतील सोनापूर येथे नुकत्याच घडलेल्या घरफोडीच्या गंभीर गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) चंद्रपूर व लाठी पोलीसांच्या संयुक्त पथकाला उल्लेखनीय यश मिळाले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपीला तेलंगणा राज्यातून अटक करण्यात आली असून त्याच्याकडून आणखी दोन गुन्ह्यांची उकल झाली आहे. सोनापूर येथील घरफोडीची घटना घडल्यानंतर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. आधुनिक तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी तेलंगणात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार विशेष पथकाने तेलंगणात जाऊन आशिष जानकीराम चौधरी (वय २६, रा. सोनापूर देशपांडे, ता. गोंडपिपरी) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने आणखी दोन घरफोडीच्या घटनांमध्ये सहभाग असल्याची कबुली दिली. त्यामुळे पोलिसांनी इतर गुन्ह्यांचाही तपास सुरू केला आहे. जप्त मुद्देमाल

घरफोडीच्या गुन्ह्यात चोरीस गेलेल्या रकमेतून १ लाख ६३ हजार २५० रुपये रोख जप्त.



चोरीच्या पैशातून खरेदी केलेले १५ हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन जप्त.

एकूण १ लाख ७८ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत.

तपासादरम्यान आरोपीकडे आढळलेली मोटारसायकल ही गोंडपिपरी पोलीस स्टेशन हद्दीतून चोरीस गेलेली असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे संबंधित गुन्ह्याचाही उलगडा झाला आहे.

सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या पथकात सपोनि. दीपक कॉंक्रेटवार, सपोनि. बलराम झाडोकार, सफौ. स्वामीदास चालेकर, पोहवा. अजय बागेसर, पोअं. गोपीनाथ नरोटे, शेखर माथनकर, चापोअं. ऋषभ बारसिंगे तसेच लाठी पोलीस स्टेशनचे पोहवा. अशोक मंजुळकर यांचा सहभाग होता.

# शिक्षण, समाजसेवा आणि कर्तृत्वाचा भव्य गौरव सोहळा!

## शिक्षक सेवा संघ व मायभूमी फाउंडेशनतर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान; मल्हारी खेडकर सरांच्या सेवापूर्ती सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**लोकनेता न्युज नेटवर्क**

"बाळासाहेब खेडकर पाथर्डी (प्रतिनिधी) : शिक्षक सेवा संघ व मायभूमी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मा. श्री मल्हारी विलास खेडकर सर यांच्या सेवापूर्ती निमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा भव्य सन्मान सोहळा दि. ६ जून २०२६ रोजी श्री संत भगवान विद्यालय, श्रीक्षेत्र भगवानगड येथे उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. नारायण स्वामीजी महाराज शास्त्री होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून आमदार मा. श्रीमती मोनिका राजीवजी राजळे उपस्थित होत्या. राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

श्रीक्षेत्र भगवानगड संस्थानचे विश्वस्त मा. श्री पांडुरंग आंधळे यांनी प्रास्ताविक करत समाजातील गुणवंतांचा गौरव करण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचा शाल,



श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते सेवानिवृत्त शिक्षक, यूपीएससी व एमपीएससी पात्र अधिकारी, प्रगतशील शेतकरी, समाजसेवक, संत-महंत तसेच विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. याचवेळी मा. श्री मल्हारी विलास खेडकर सर यांचा सपत्नीक विशेष सन्मान करण्यात आला.आपल्या मनोगतात खेडकर सरांनी हा सन्मान माझ्या ३५ वर्षांच्या शैक्षणिक, सामाजिक व अध्यात्मिक कार्याचा गौरव असल्याची भावना व्यक्त

> शिक्षण, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, समाजजागृती, वारकरी सेवा आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मा. श्री मल्हारी विलास खेडकर सर यांना विविध संस्थांकडून आतापर्यंत १०७ पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. सेवापूर्ती सोहळ्यात त्यांच्या कार्याचा विशेष सन्मान करण्यात आला.

केली. निवृत्तीनंतरही समाजसेवा, पर्यावरण संवर्धन व युवक मार्गदर्शनासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

आमदार मोनिका राजळे यांनी खेडकर सरांच्या कार्याचे कौतुक करत समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान हा प्रेरणादायी उपक्रम असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात ह.भ.प. नारायण स्वामीजी महाराज शास्त्री यांनी खेडकर सरांना विविध संस्थांकडून मिळालेल्या १०७ पुरस्कारांचा उल्लेख करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाला ह.भ.प. यादव महाराज बडे, ह.भ.प. संतोष महाराज शास्त्री, ह.भ.प. हनुमंत महाराज शास्त्री, ह.भ.प. अनिल महाराज वाळके, ह.भ.प. संतोष महाराज गिरी, ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आरिफ बेग, श्री कैलास तुपे व श्री किरण केळगंद्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री बाळासाहेब घोंगडे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ग्रामसेवक रेनकुंटवार, गित्ते व पाटील यांना सेवानिवृत्तीपर निरोप ग्रामसेवक संघटनेच्या वतीने कपडेरूपी आहेर व भेटवस्तू देऊन सत्कार



लोकनेता न्युजनेटवर्क
संजय यलमवाड मुखेड / प्रतिनिधी

मुखेड पंचायत समितीचे ग्रामपंचायत अधिकारी बालाजी रेनकुंटवार, नीळकंठ गित्ते आणि अशोक पाटील यांनी नियत वयोमानानुसार प्रदीर्घ सेवा बजावून सेवानिवृत्ती स्वीकारल्याने मुखेड तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या वतीने १५ जून रोजी पंचायत समितीच्या सभागृहात सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी गटविकास अधिकारी शिवाजीराव ढवळे यांच्या हस्ते तिन्ही सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा कपडेरूपी आहेर व भेटवस्तू देऊन यथोचित सत्कार करण्यात आला तसेच त्यांना सेवानिवृत्तीपर शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमाला गटविकास अधिकारी शिवाजीराव ढवळे, विस्तार अधिकारी धनाजीराव धर्मेकर, देविदास जोगपेट्टे, संभाजी धुळगंडे, माजी विस्तार अधिकारी शंकरराव येवते, ग्रामसेवक संघटनेचे तालुकाध्यक्ष नजीरसाब सय्यद, सचिव सतीश गायकवाड तसेच नांदेड जिल्हा कर्मचारी पतसंस्थेचे सचिव पांडुरंग नागेश्वर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकारी बालाजी रेनकुंटवार, अशोक पाटील आणि नीळकंठ गित्ते यांना निरोप देण्यासाठी आयोजित या समारंभात आयएएस अधिकारी ऋषिकेश पालीमकर यांचीही उपस्थिती लाभली. यावेळी तिन्ही निरोपमूर्तींचा सपत्नीक सन्मान करून त्यांना कपडेरूपी आहेर व भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या.

कार्यक्रमास मुखेड पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य तसेच सेवानिवृत्त अधिकारी रेनकुंटवार, गित्ते आणि पाटील यांचे नातेवाईक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय सैन्यात लेफ्टनंट पृथ्वीराज मुळीक यांचा ग्रामस्थ व तेजसिंह पाटील यांच्याकडून सन्मान!

**लोकनेते न्यूज नेटवर्क**
इंदापूर ता. प्रति:- राहुल जाधव

इंदापूर: कर्दनवाडीचे सुपुत्र पृथ्वीराज मुळीक यांची भारतीय सैन्यदलामध्ये 'लेफ्टनंट' पदावर नियुक्ती झाल्याबद्दल संपूर्ण तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. या देदिप्यमान यशाबद्दल कर्दनवाडी ग्रामस्थ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे इंदापूर तालुकाध्यक्ष तेजसिंह पाटील



यांच्या वतीने पृथ्वीराज यांचा विशेष सन्मान करण्यात आला.पृथ्वीराज यांनी अत्यंत खडतर परिश्रम घेऊन भारतीय सैन्यदलातील मानाच्या लेफ्टनंट पदाला गवसणी घातली आहे.कर्दनवाडीत एकच जल्लोष आपल्या गावातील तरुण देशाच्या सीमेवर अधिकारी म्हणून जात असल्याचा सार्थ अभिमान ग्रामस्थांनी व्यक्त केला. तालुकाध्यक्ष तेजसिंह पाटील यांनी पृथ्वीराज यांच्या जिद्दीचे कौतुक करत, हा सन्मान केवळ एका कुटुंबाचा नसून संपूर्ण इंदापूर तालुक्याचा गौरव असल्याचे सांगितले.पृथ्वीराज यांचे हे यश ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांना आणि तरुणांना सैन्यदलात करिअर करण्यासाठी मोठी प्रेरणा देणारे ठरेल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.आपल्या मातीतील सुपुत्राने देशाच्या संरक्षण दलात मिळवलेले हे यश खरोखरच कौतुकास्पद आणि 'ग्रेट' आहे! पृथ्वीराज मुळीक यांना पुढील देशसेवेसाठी तालुक्यातून शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.

# विद्यार्थ्यांसोबत भोजनाचा आस्वाद; पुस्तके वाटप करून नवीन शैक्षणिक वर्षाचे स्वागत....



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
वैजापूर प्रतिनिधी अर्जुन शिंदे

१५ जून २०२६
जिल्हा परिषद शाळा सुरू झाल्याच्या निमित्ताने लासूर सर्कलच्या जिल्हा परिषद सदस्या सौ. संगीता सुभाष तांबे तसेच पालखेड गणाचे पंचायत समिती सदस्य राहुल पाटील शेळके यांनी पालखेड, हडस पिंपळगाव आणि भिसेवाडी येथील जिल्हा परिषद शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

यावेळी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमास शिक्षण अधिकारी, संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, गावातील सरपंच, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने पालकांनीही कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

विशेष म्हणजे, पंचायत समिती सदस्य राहुल पाटील शेळके यांनी विद्यार्थ्यांसोबत मध्यान्ह भोजनाचा आस्वाद घेतला. विद्यार्थ्यांबरोबर भोजन केल्यामुळे मुलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून नियमित शाळेत उपस्थित राहण्याचे व गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याचे आवाहन केले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी लोकप्रतिनिधी, शिक्षण विभागाचे अधिकारी, शिक्षक व पालक यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले. नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात झाली असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वांनी सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# पाथर्डी तालुक्यातील HSC व SSC पुनर्परीक्षार्थींची परीक्षा सुरळीत सुरु



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी – संतोष नरवडे

पाथर्डी : पाथर्डी तालुक्यातील इयत्ता १० वी (SSC) व १२ वी (HSC) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची परीक्षा एम. एम. निराळी विद्यालय, पाथर्डी तसेच संत ज्ञानेश्वर विद्यालय, पाथर्डी येथे सुरळीतपणे सुरू झाली आहे.

परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची उपस्थिती समाधानकारक असून, परीक्षा शांततापूर्ण वातावरणात पार पडत आहे.

परीक्षेच्या अनुषंगाने केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच परीक्षा प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी केंद्रप्रमुख, पर्यवेक्षक व संबंधित प्रशासनाकडून विशेष दक्षता घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनीही वेळेवर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून शिस्तबद्ध पद्धतीने परीक्षेत सहभाग नोंदविला.

शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा नियोजनबद्ध व सुरळीतपणे पार पडत असल्याची माहिती परिरक्षक कार्यालय प्रमुख तथा गटशिक्षणाधिकारी, शिवाजीराव कराड यांनी दिली.

# जलसंधारणच्या प्रलंबित कामांसाठी आ. केराम यांची बैठक लहान-मोठ्या प्रकल्पांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा

**लोकनेता न्युज नेटवर्क**

किनवट प्रतिनिधी,शेख शौकत
आगामी
पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर किनवट आणि माहूर तालुक्यातील जलप्रकल्पांची सद्यस्थिती जाणून घेत, प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्या साठी, शेतीला संजीवनी देणाऱ्या जलसंपदा व जलसंधारण विभागाच्या प्रकल्पांची कामे जलद गतीने पूर्ण व्हावीत, या उद्देशाने आ. भीमराव केराम यांनी संबधित अधिकाऱ्याची महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली.

पावसाळा तोंडावर आला असताना पूरपरिस्थिती किंवा इतर तांत्रिक अडचणींमुळे प्रकल्पांचे नुकसान होऊ नये, तसेच नागरिकांना त्याचा त्रास होऊ नये, यासाठी आमदारांनी प्रशासनाला सतर्क राहण्याचे आदेश दिले.

बैठकीदरम्यान आमदार भीमरावजी केराम यांनी दोन्ही तालुक्यांतील जलसंपदा आणि जलसंधारण विभागांतर्गत सुरू असलेल्या लहान-मोठ्या प्रकल्पांच्या प्रगतीचा सविस्तर



आढावा घेतला. जी -कामे अद्याप प्रलंबित आहेत किंवा ज्या कामांचा वेग संथ आहे, त्याबाबत त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. ही कामे पावसाळा सुरू होण्यापूर्वी सुरक्षित टप्प्यावर आणण्याचे निर्देश त्यांनी दिले.

पावसाळ्यात अतिवृष्टी किंवा धरणांतून पाण्याचा विसर्ग करताना उद्भवणाऱ्या संभाव्य धोक्यांचा विचार करून, जलसंपदा व जलसंधारण
आढावा चोवीस विभागाने तास सतर्क राहावे, असे स्पष्ट निर्देश आमदारांनी दिले. आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी विभागांनी परस्परांशी समन्वय ठेवून काम करावे, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केलीया अत्यंत महत्त्वाच्या बैठकीला जलसंधारण उपविभागीय अधिकारी विभागाचे देसाई साहेब तसेच जलसंपदा विभागाचे उपविभागीय अधिकारी सूर्यवंशी साहेब प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी आमदारांना सध्या सुरू असलेल्या कामांची तांत्रिक माहिती दिली व दिलेल्या निदेशांचे तंतोतंत पालन करण्याचे आश्वासन दिले.

# फुलेनगर येथे शिवसेना नगरसेवकांच्या पुढाकाराने बोर दुरुस्ती; पाणीप्रश्न सुटला!

## नगरसेवक सुभाष दादा बलपेलवाड यांनी घटनास्थळी स्वत: भेट दिली आणी तातडीने बोर दुरुस्तीचे काम करून घेतले.

**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**

हिमायतनगर लक्ष्मण शेन्नेवाड फुलेनगर येथील जिल्हा परिषद शाळेच्या आवारातील नादुरुस्त बोरची दुरूस्ती करण्यात आली असुन, यामुळे स्थानिक नागरिकांची पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या दूर झाली आहे.

वॉर्ड क्रं.१७ चे शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे नगरसेवक सुभाष दादा बलपेलवाड यांनी स्वतः पुढाकार घेऊन हे काम पूर्ण करून घेतले.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, फुलेनगर येथील जिल्हा परिषद शाळेतील बोर काही दिवसांपासून नादुरुस्त होते. तसेच परिसरातील पाणी पुरवठ्यात अडथळे येत होते.ही समस्या लक्षात घेऊन नगरसेवक सुभाष



दादा बलपेलवाड यांनी घटनास्थळी स्वतः भेट दिली आणी तातडीने बोर दुरुस्तीचे काम करून घेतले.यासोबत स्थानिक नागरिक असद मौलाना यांच्या घराजवळ नविन स्टार्टरही बसविण्यात आले आहे.या कामामुळे परिसरातील जनतेला शुद्ध पाणी आता सुलभतेने उपलब्ध होणार आहे.

या विकासकामाच्या प्रसंगी नगरसेवक सुभाष दादा बलपेलवाड यांच्यासह परिसरातील अनेक प्रमुख नागरिक उपस्थित होते. यामध्ये सुभाष दारवंडे,असद मौलाना, ज्ञानेश्वर लिंगमपले,एजाज मौलाना,इलियाज मौलाना, सिध्दार्थ भगत,शेख अकबर,बबलु भाई, तुकाराम आरेपल्लू आणखी प्रल्हाद मुट्टलवाड या मान्यवरांचा समावेश होता.या यशस्वी कामाबद्दल फुलेनगर येथील नागरिकांनी नगरसेवक सुभाष दादा बलपेलवाड यांचे आभार मानले.---

# स्वराज्य असंघटित कामगार संघटनेच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी श्री. संघर्ष बनसोडे यांची नियुक्ती



लोकनेता न्यूज नेटवर्क

भूम | रविंद्र लोमटे

स्वराज्य असंघटित कामगार संघटनेच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी संघर्ष बनसोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दिनांक १५ जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निलेशजी उजगरे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या नियुक्तीद्वारे धाराशिव जिल्ह्यातील असंघटित कामगारांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील कामगारांपर्यंत पोहोचवणे तसेच संघटनेचे कार्य अधिक व्यापक करण्याची महत्त्वाची जबाबदारी बनसोडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

नियुक्तीनंतर बोलताना संघर्ष बनसोडे यांनी संघटनेच्या विश्वासाबद्दल आभार व्यक्त करत, जिल्ह्यातील असंघटित कामगारांच्या हक्कांसाठी व कल्याणासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. संघर्ष बनसोडे यांच्या नियुक्तीबद्दल विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मनसे तर्फे विद्यार्थ्यांना छत्री व खाऊ वाटप.





**लोकनेता न्यूज नेटवर्क**
उरण विठ्ठल ममताबादे
कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक तथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्ताने आज बेलपाडा गावातील रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गव्हाण विभाग सचिव ( समाजसेवक ) प्रदीप महादेव ठाकुर यांच्या पुढाकाराने बेलपाडा गावातील विद्यार्थ्यांसाठी छत्री व खाऊ वाटत करण्यात आले. त्या वेळी पनवेल तालुका सचिव निर्दोष केशव गोंधळी, उलवे शहर माजी अध्यक्ष राहुल बाबुराव पाटील,उलवे शहर अध्यक्ष आकाश श्रीकांत देशमुख, गव्हाण विभाग उपाध्यक्ष बाळकृष्ण ( बबलु) जगन्नाथ पाटील, संदिप म्हात्रे, अजित ठाकूर, गजानन म्हात्रे आदि विभागातील बरेच पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.छत्री व खाऊ वाटप केल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. सदर उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# *महानगरपालिकेकडून विनापरवाना व्यवसाय धारकांना नोटीस*;

## “व्यवसाय प्रमाणपत्र काढण्याचे आदेश”

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
परभणी/प्रतिनिधी :- रमेश मुलगीर

परभणी शहर महानगरपालिकेच्या



वतीने शहरातील विनापरवाना व्यवसाय चालविणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाईसंदर्भात महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली असून, सर्व संबंधित दुकानदारांना व्यवसाय प्रमाणपत्र घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या आदेशानुसार मुख्य स्वच्छता निरीक्षकांना आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत.
मंगळवार, दि. १६ जून रोजी आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या दालनात प्रभाग समिती ‘अ’, ‘ब’ आणि ‘क’ अंतर्गत बैठक आयोजित करण्यात आली.
या बैठकीत शहरातील ऑनलाइन व्यापार व विविध व्यवसाय करणाऱ्या दुकानदारांना व्यवसाय प्रमाणपत्र ऑनलाइन पद्धतीने काढण्याच्या सूचना देण्यात आल्या.
बैठकीस उपआयुक्त तुकाराम कदम, उपआयुक्त प्रशांत कांबळे, मालमत्ता व्यवस्थापक भगवान यादव, मुख्य व्यवस्थापक करण गायकवाड, मुख्य स्वच्छता निरीक्षक विकास रत्नपारखे, संगणक विभाग प्रमुख अदनान कादरी, स्वच्छता निरीक्षक लक्ष्मण जोगदंड, कुणाल भारसाकळे, शेख शादाब, प्रल्हाद देशमाने, सौरभ जोगदंड आदी उपस्थित होते.
शहरातील सर्व व्यावसायिकांनी व्यवसाय प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे. यासाठी संबंधित दुकानदारांनी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन नोंदणी करून आवश्यक कागदपत्रे जोडावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत.
ऑनलाइन अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित दुकानाची पाहणी करून व्यवसाय प्रमाणपत्र देण्याचे आदेश आयुक्तांनी मुख्य स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता निरीक्षकांना दिले आहेत.
तसेच, ज्या व्यवसाय धारकांनी अद्याप ऑनलाइन अर्ज केलेला नाही, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शहरातील सर्व व्यवसायिकांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती व सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त नितीन नार्वेकर यांनी केले आहे.

# पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कोळसांगवी येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
बाळासाहेब खेडकर पाथर्डी प्रतिनिधी
महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे लोकप्रिय पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कोळसांगवी येथे सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. पालकमंत्री विखे पाटील यांनी वाढदिवसानिमित्त पोस्टर, हार-तुरे व पुष्पगुच्छ न देता शालेय विद्यार्थी आणि गरजू नागरिकांना मदत करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत माननीय युवराज फुंदे (लोकनियुक्त



सरपंच कोळसांगवी) तथा भाजपा तालुका उपाध्यक्ष, पाथर्डी यांच्या मित्रपरिवाराच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. मौजे कोळसांगवी (ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळसांगवी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विजयनगर तसेच अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन व इतर शैक्षणिक साहित्य देऊन वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच दगडू नाना धनवडे होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र फुंदे, गणेश धनवडे, ग्रामसेविका सांगळे मॅडम, गुलाब बापू घुले, संभा घुले, आदेश साळवे, बलभीम साळवे, रवी गाडे, आकाश भागवत, बबन कुसळकर, राजू कुसळकर, साहेबराव कुसळकर, काटकर सर, विजयनगरचे मुख्याध्यापक बांगर सर, घुले मॅडम, सुलभा काकी घुले, ग्रामपंचायत कर्मचारी रामदास साळवे यांच्यासह ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सामाजिक विचारांचे कौतुक करत, वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणे हा स्तुत्य उपक्रम असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# नको अटी-नको शर्ती,आम्हाला द्या संपूर्ण कर्जमुक्ती..

## या घोषणांनी आज मराठवाडाव्यापी बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅली विभागीय कार्यालयावर धडकली.

**दै.लोकनेता न्यूज नेटवर्क**
छ.संभाजीनगर | डॉ.ज्ञानदेव चेपटे

छ.संभाजीनगर,दि.१५ : शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी आणि त्यांच्या न्याय मागण्यांसाठी शिवसैनिक रस्त्यावर उतरले.
शेतकऱ्यांच्या वेदना ऐकण्याऐवजी त्यांच्या आवाजाला दाबण्याचा पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून राज्य सरकारने आज छत्रपती संभाजीनगरात प्रयत्न केला आहे. बळीराजाच्या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी आंदोलन रोखण्याचा प्रयत्न राज्य सरकारचा होता असे पोलिसांच्या वागणिकेतून स्पष्टपणे दिसून आले आहे. बळीराजाचा मनातील दाबलेला जनआक्रोश आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने विभागीय आयुक्त यांना निवेदन देऊन राज्य सरकार दरबारी मांडला आहे. आंदोलनात शिवसेना नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पोलिसांनी




आंदोलनकर्त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.राज्य सरकारने मागण्या मान्य करून न्याय देण्याची मागणी केली. याप्रसंगी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे,विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना उपनेते सुभाष पाटील,




सहसंपर्कप्रमुख राजेंद्र काळे, किसान सेना जिल्हाप्रमुख नानासाहेब पळसकर, बाबासाहेब मोहिते, उपजिल्हाप्रमुख संतोष खेंडके, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, हरिभाऊ हिवाळे, ज्ञानेश्वर डांगे, दिग्विजय शेरखाने, तालुकाप्रमुख शंकरराव ठोंबरे, आनंद भालेकर, सोमनाथ करपे, संजय मोटे, विष्णू जाधव, विधानसभा प्रमुख प्रमोद ठेंगडे, विधानसभा संघटक गिरीश चपळगांवकर व गणेश नवले उपस्थित शिवसेनेने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.
-----------------------

# बोगस शाळा व अनधिकृत क्लासेस वर प्रशासनाचा ‘हंटर’

## *फौजदारी कारवाईचा इशारा ; पालकांनी सावध राहावे, शिक्षण विभागाच्या आव्हान*

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

देगलूर तालुक्यात शासनाच्या मान्यते शिवा शाळा चालविणाऱ्या संस्था, कोचिंग क्लासेस च्या नावाखाली शिक्षण देणारे संचालक आणि नियमाचे उल्लंघन करणाऱ्या व्यवस्थापनाची आता खैर नाही. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार अशा संस्थांवर दंडात्मक कारवाईचे थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा फोटो विचारा गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती देगलूर यांनी दिला आहे.
राज्यातील अनधिकृत शाळा बंद करण्याबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने देगलूर तालुक्यातही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.
सीबीएसई , आयसीएसई, आयबी किंवा अन्य मंडळाची सलग्न असल्याचा दावा करणाऱ्या, मात्र शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र अथवा आवश्यक की परवानगी नसलेल्या संस्थावर कायदेशीर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



*गतवर्षी अनेक शाळांना बसला होता कुलूप*
शैक्षणिक वर्ष 2024 -25 मध्ये कोचिंग क्लासेस च्या नावाखाली शाळेच्या वेळेत शिक्षण देणाऱ्या अनेक अनाधिकृत इंग्रजी शाळांची माहिती समोर आली होती. त्यावेळी शिक्षण विभागाने संबंधित संस्थांना नोटिसा बजावून त्या बंद करण्याची कारवाई केली होती. मात्र काही ठिकाणी पुन्हा अशा प्रकारचे प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाल्याने यंदा प्रशासन अधिक आक्रमक झाले आहे.
शैक्षणिक वर्ष 2026 - 27 मध्ये कोणतीही संस्था शाळेच्या वेळेत कोचिंग क्लासेस च्या नावाखाली वर्ग चालवत असल्याचे आढळल्यास सभा घेता विरोधात थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे शिक्षण विभाग स्पष्ट केले आहे.
*तालुक्यात फक्त 18 इंग्रजी शाळांनाच मान्यता*
देगलूर तालुक्यात अनेक ठिकाणी नर्सरी, एलकेजी आणि युकेजी वर्ग सुरू करण्यात येत आहेत. मात्र शासनाची आवश्यक्य मान्यता न घेता हे वर्ग चालविणे नियमबाह्य असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.
त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांचा प्रवेश घेताना संबंधित शाळेची शासन मान्यता तपासूनच निर्णय घ्यावा, अन्यथा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. असा इशारा देण्यात आला आहे.
*फ्री प्राइमरी शाळानाही नियमाचे बंधन*
देगलूर तालुक्यात आणि ठिकाणी नर्सरी, एलकेजी आणि यूकेजी वर्ग सुरू करण्यात येत आहेत. मात्र शासनाची आवश्यक्य मान्यता न घेता हे वर्ग चालविणे नियम भाई असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. अशा संस्थांनी तातडीने आवश्यक की परवानगी मिळवाव्यात, अन्यथा त्यांच्यावर ही कायदेशीर कारवाई होणार आहे. *सेमी इंग्रजी वर्गावर ही विभागाची करडी नजर* देगलूर तालुक्यातील जिल्हा परिषद आणि अनुदानित शाळांमध्ये सुरू असलेल्या सेमी इंग्रजी वर्गाबाबत ही प्रशासनाने स्पष्ट निर्देश दिले आहेत शासनाने मंजूर केलेल्या तुकड्यापेक्षा अधिक वर्ग स्वरूप ठेवणे बेकादेशीर ठरणार असून अतिरिक्त तुकड्या तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शासनमान्य क्षमतेनुसारच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा, असेही सांगण्यात आले आहे.
*पालकांना शिक्षण विभागाच्या आव्हान*
अनाधिकृत शाळा, बोगस इंग्रजी स्कूल किंवा केवळ आकर्षक जाहिराती करून विद्यार्थ्यांना प्रवेश देणाऱ्या संस्थांच्या बळी पडू नये आपल्या पाल्यांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी केवळ शासन मान्यता प्राप्त शाळांमध्येच प्रवेश द्यावा, असे आव्हान गटशिक्षणाधिकारी बालाजी गोडाजी व ज्येष्ठ शिक्षण
विस्ताराधिकारी हमीद दौलतावादी यांनी केले आहे. शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेल्या अनधिकृततेला
मला घालण्यासाठी प्रशासनाने आता कठोर भूमिका घेतल्याने देगलूर तालुक्यातील बोगस शाळा आणि नियमबाह्य शिक्षण व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# “शेतकऱ्यांना शासकीय दरातच मिळणार खत; वामनराव पाटील यांच्या पुढाकाराने उद्या हिमायतनगर कृषी कार्यालयात बैठक!”




**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**
लोकनेता न्युज नेटवर्क
हिमायतनगर लक्ष्मण शेन्नेवाड

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करूनही तालुक्यातील अनेक शेतकरी बांधवांना अद्याप सोयाबीन बियाणे आणि खतांचे वाटप झालेले नाही.या गंभीर समस्येची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष वामनराव पाटील मिराशे वडगावकर यांनी आज हिमायतनगर कृषी कार्यालयाला भेट दिली.यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींबाबत सविस्तर माहिती घेतली.
शेतकऱ्यांना भेडसावणारी खत टंचाई दुर करण्यासाठी उद्या दिनांक १७ जुन रोजी सकाळी ११:०० वाजता हिमायतनगर कृषी कार्यालय येथे खत उपलब्धतेची विशेष चौकशी केली जाणार आहे.ज्या खत विक्रत्याकडे साठा उपलब्ध असेल त्या दुकानाच्या नावाने कृषी अधिकाऱ्यांच्या हस्ते शेतकऱ्यांना अधिकृत चिठ्ठी दिली जाईल.या चिठ्ठीच्या आधारे सर्व शेतकरी बांधवांना शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार खत खरेदी करता येणार आहे.
या मोहिमेचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी उद्या ११:०० वाजता हिमायतनगर कृषी कार्यालयाला समोर मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुकाध्यक्ष वामनराव पाटील मिराशे वडगावकर यांनी केले आहे.

# एसटी कर्मचारी चळवळीतील झुंजार कार्यकर्ते अनंत राजे कराड यांच्यावर मोठी जबाबदारी

## पुणे विभाग सहसचिवपदी बिनविरोध निवड; सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
बाळासाहेब खेडकर | पाथर्डी
एसटी कर्मचारी व सर्वसामान्यांच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे पाथर्डी तालुक्यातील शिरसाटवाडी येथील अनंत राजे कराड यांची एसटी कामगार संघटना, पुणे विभागाच्या सहसचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे एसटी कर्मचारी चळवळीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.
शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले अनंत राजे कराड हे गेल्या अठरा वर्षांपासून एसटी कामगार संघटनेत सक्रियपणे कार्यरत आहेत. एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवून संघटनात्मक बांधणी



मजबूत करण्यासाठी योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत एसटी कामगार संघटनेचे केंद्रीय जनरल सेक्रेटरी हनुमंतरावजी ताठे साहेब, केंद्रीय अध्यक्ष संदीप भाऊ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पुणे विभागाचे अध्यक्ष दिलीप भाऊ परब व विभागीय सचिव मोहनदादा जेधे यांच्या नेतृत्वात त्यांची पुणे विभाग सहसचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

### “कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी लढा कायम”

एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणारे अनंत राजे कराड यांच्यावर पुणे विभाग सहसचिवपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याने संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास कर्मचाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे कर्मचारी चळवळीला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या निवडीबद्दल माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, खासदार निलेश लंके, माजी खासदार सुजय विखे पाटील, आमदार शिवाजीराव गर्जे, प्रतापकाका ढाकणे, आमदार मोनिकाताई राजळे, ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके, अर्जुनराव शिरसाठ, हनुमंतरावजी ताठे, संदीप भाऊ शिंदे, दिलीप भाऊ परब, मोहनदादा जेधे, जगताप बापू, संदीप थोरवे, कुंदन कांडेकर, रामभाऊ जेऊघाले, अंबादास शिरसाट, श्री. सोनटक्के, सुभेदार गोरक्ष शिरसाठ, जनार्दन शिरसाट तसेच एसटी कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्या हस्ते राष्ट्रीय प्रेम दिनानिमित्त मनीषा खळे यांचा सन्मान

लोकनेता न्यूज नेटवर्क
पाचोड | त्रिसिंग जायभाये

पाचोड दि. १४: राष्ट्रीय प्रेम दिनानिमित्त समाजामध्ये प्रेम, विश्वास, आदर, आपुलकी, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मूल्यांचा प्रसार करून समाजपरिवर्तनाचे कार्य करणाऱ्या आशिश ग्राम रचना ट्रस्ट, पाचोड संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. मनीषा खळे यांचा शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. दि. 12 जून रोजी देशभरामध्ये समाजामध्ये प्रेम भावनेची जाणीव निर्माण करून देण्याचे उद्देशाने राष्ट्रीय प्रेम दिन साजरा करण्यात येतो. येथील शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय प्रेम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे हे होते.

समाजामध्ये सकारात्मक विचार, सामाजिक बांधिलकी, युवक व किशोरवयीन मुला-मुलींचा सर्वांगीण विकास, आरोग्य जनजागृती, शिक्षण क्षेत्रातील प्रोत्साहन तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून प्रेम, विश्वास आणि मानवतेची मूल्ये रुजविण्याचे कार्य आशिश ग्राम रचना ट्रस्टच्या माध्यमातून सातत्याने केले जात आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राष्ट्रीय प्रेम दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य चंद्रसेन कोठावळे यांनी सौ. मनीषा खळे यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मापत्र देऊन गौरव करण्यात आला.

प्रेम म्हणजे फक्त एक नातं नाही तर प्रेम म्हणजे आई-वडिलांचा आशीर्वाद, भाऊ बहिणीचे प्रेम, जीवनसाथीची साथ, मुलांचे आपुलकीचे शब्द आणि मित्रांची निस्वार्थ मैत्री अशा समाजामध्ये प्रेमाच्या विविध छटा आहेत. ज्या नात्यांमध्ये प्रेम, विश्वास, आदर आणि आपुलकी असते ती नाती काळाच्या प्रत्येक कसोटीमध्ये टिकून राहतात असे मत राष्ट्रीय प्रेम दिनाच्या निमित्ताने सौ. मनीषा खळे यांनी व्यक्त केले. सौ. मनीषा खळे या सत्काराला उत्तर देताना बोलत होत्या.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी सांगितले की, समाजात प्रेम, विश्वास, परस्पर आदर आणि माणुसकीची भावना जपणे ही काळाची गरज आहे. अशा मूल्यांवर आधारित कार्य करणाऱ्या सामाजिक




संस्थांचे समाजातील योगदान अत्यंत महत्त्वाचे असून आशिश ग्राम रचना ट्रस्टचे कार्य प्रेरणादायी आहे.
या प्रसंगी आशिश ग्राम रचना ट्रस्टचे कर्मचारी किशोर शिंदे,रूपा टकले तसेच महाराजा सयाजीराव गायकवाड सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष संतोष फाटे व अरुण मूळे उपस्थित होते. डॉ. कोठावळे सरांनी सौ. मनीषा खळे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रम आनंदी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. समाजामध्ये प्रेम, आपुलकी, विश्वास आणि सामाजिक सलोखा वाढविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

# शेतकऱ्यांना अटी-शर्तीशिवाय कर्जमाफी द्या.......

## उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाधिकाऱ्यांकडे विविध

लोकनेता न्युज नेटवर्क
जीवन जाधव औसा...

*लातूर, दि.* – *शिवसेना* *(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने येथील* *जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य निदर्शने करून शेतकऱ्यांना कोणत्याही अटी-शर्तीशिवाय संपूर्ण कर्जमाफी द्यावी,* शेतीमालाला योग्य भाव द्यावा, सलग १२ तास सुरळीत वीजपुरवठा करावा, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या ३३ हजार कोटी रुपयांच्या विशेष मदत पॅकेजची तातडीने अंमलबजावणी करावी, तसेच पीकविमा कंपन्यांच्या मनमानीला आळा घालून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्यावा, यासह विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी बाष्टेवाड यांना देण्यात आले.
निवेदनात म्हटले आहे की, राज्य सरकारने नुकतीच अनेक अटी व शर्ती घालून कर्जमाफीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात ही योजना कर्जमाफी नसून कर्जवसुलीची योजना असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. या योजनेमध्ये प्रामुख्याने सन २०१९ ते २०२५ या कालावधीचा उल्लेख करण्यात आला असून यापूर्वी झालेल्या कर्जमाफीचाही लाभ अनेक शेतकऱ्यांना मिळालेला नाही. नियमित कर्जफेड करणारे असोत किंवा थकीत शेतकरी



असोत, सर्वांवर अन्यायकारक अटी लादण्यात आल्या आहेत. "भीक नको पण कुत्रे आवर" अशा स्वरूपाच्या या अटी असल्याची टीका निवेदनातून करण्यात आली.
"सातबारा कोरा करू" असे आश्वासन देणारे सरकार आज फसव्या कर्जमाफीचा गाजावाजा करत शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे पाप करत आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अटी-शर्ती न लावता सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.
कर्जमाफीच्या संभ्रमामुळे राज्यातील अनेक बँका शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यास नकार देत आहेत.
कृषी सेवा केंद्रांमध्ये पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध नसून दुप्पट दराने खत विक्री करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट केली जात आहे. कांदा, कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून त्याला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच शेतकऱ्यांना सलग १२ तास सुरळीत वीजपुरवठा करावा, अशीही मागणी करण्यात आली.
सन २०२५ मधील अतिवृष्टीनंतर राज्य शासनाने ऑक्टोबर २०२५ मध्ये सुमारे ३३ हजार कोटी रुपयांच्या मदतीच्या पॅकेजची घोषणा केली होती. मात्र हे पॅकेज आजही कागदावरच असून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे जाहीर केलेल्या निधीची तात्काळ अंमलबजावणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा करावी, अशी मागणी करण्यात आली.
पीकविमा कंपन्या केवळ प्रीमियम वसूल करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट करत आहेत. संपूर्ण लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊनही अनेक शेतकऱ्यांना विमा भरपाई मंजूर करण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित विमा कंपन्यांवर कठोर कारवाई करून पात्र शेतकऱ्यांना तात्काळ न्याय द्यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.
यावेळी जिल्हासमन्वयक पप्पूभाई कुलकर्णी, महिला जिल्हा संघटिका जयश्रीताई उटगे, उपजिल्हाप्रमुख बी. एन. डोंगरे, उपजिल्हाप्रमुख बजरंगदादा जाधव, खरोसा जिल्हा परिषद सदस्य तानाजी जाधव, तालुकाप्रमुख शंकर रांजणकर, कैलास पाटील, प्रशांत मोरे, अविनाश रेशमे, महानगरप्रमुख विष्णूपंथ साठे, लातूर शहरप्रमुख शिवराज मुळावकर, औसा शहरप्रमुख सुरेशदादा भुरे, उपतालुकाप्रमुख सचिन दत्तू पाटील, महेश फुले, सचिन पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, युवासेना विधानसभाप्रमुख अक्षय चवळे, शिवआरोग्य सेना जिल्हाध्यक्ष त्र्यंबक स्वामी, फेरीवाला सेना हणमंत पडवळ, विधानसभा समन्वयक सोमनाथ झुंजारे, विधानसभा संघटक विष्णू काबळे, गोविंद बेंबडे, उदगीर तालुका समन्वयक व्यंकट साबणे, शहरसंघटक प्रदीप उपासे, अरुण बिराजदार, उपशहरप्रमुख ऋषिकेश पाटील, रोहित दोपारे, मारुती सूर्यवंशी, करण शिंदे, सोशल मीडिया जिल्हाप्रमुख विशाल पवार, पारुडकर, सुमित क्षीरसागर, जीवन जाधव, अनिल यमपाळे, सौरभ पारुडकर, व्यंकट राजेंद्र, देवानंद मुळे, बाळू जाधव, व्यंकट गिरी, अजार मुजावर, बाबा बागवान, जीवन जाधव आदी शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चारा उत्पादनासाठी संयुक्त आढावा बैठक संपन्न



लोकनेतान्युज नेटवर्क

नांदेड जिल्हा प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

नांदेड, दि. 15 जून : संभाव्य दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण होणारी चारा टंचाई लक्षात घेऊन चारा उत्पादन वाढीसाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त आढावा बैठक काल १५ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.
या बैठकीस नांदेड पाटबंधारे मंडळ, दक्षिण नांदेड पाटबंधारे मंडळ, अप्पर पैनगंगा प्रकल्प, इसापूर, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.
बैठकीत संभाव्य दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी पुरेशा चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी विविध विभागांनी समन्वयाने काम करण्यावर भर देण्यात आला.
तसेच, उपलब्ध जलस्रोतांचा नियोजनबद्ध वापर करून चारा पिकांचे उत्पादन वाढविणे, आवश्यक नियोजन करणे आणि संबंधित विभागांनी परस्पर सहकार्याने तातडीच्या उपाययोजना राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.
आगामी काळात जिल्ह्यात चारा टंचाई निर्माण होऊ नये यासाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करून प्रभावी कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

# "आयुक्तांचा आदेश धाब्यावर!

## ३० दिवसांची मुदत संपूनही अर्जदाराला माहिती दिली नाही"




दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क
इंदापूर ता.प्रति:- राहुल जाधव

इंदापूर : राज्य माहिती आयोगाच्या स्पष्ट आदेशानंतरही इंदापूर तहसील कार्यालयाकडून माहिती अधिकारांतर्गत मागितलेली माहिती अद्याप उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.
त्यामुळे माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीबाबतच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
माहिती अधिकार कार्यकर्ते तथा अपीलार्थी राहुल भागवत जाधव यांनी मागितलेल्या माहितीबाबत राज्य माहिती आयुक्त पुणे खंडपीठाचे माहिती आयुक्त मकरंद रानडे यांनी ४ मे २०२६ रोजी महत्त्वपूर्ण आदेश पारित केला होता. या आदेशानुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, इंदापूर यांना संबंधित प्रकरणात जन माहिती अधिकारी घोषित करून, जोडपत्र 'अ' मधील मागितलेली माहिती आयोगाचा आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले होते.
याचबरोबर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गौण खनिज संकलन विभागाच्या अधिकाऱ्यांनी माहिती अर्जावर विहित मुदतीत कोणतीही कारवाई न केल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(१) चा भंग झाल्याचे आयोगाने नमूद केले. तसेच त्यांच्याविरुद्ध कलम २०(१) अंतर्गत १० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये, याबाबत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेशही आयोगाने दिले होते.
मात्र आयोगाने दिलेली ३० दिवसांची मुदत संपून तब्बल १० दिवस उलटून गेले असतानाही संबंधित माहिती अर्जदाराला देण्यात आलेली नाही. अर्जदार राहुल जाधव यांनी माहिती मिळविण्यासाठी अनेक वेळा तहसील कार्यालयात भेट दिली असता, संबंधित अधिकारी "थांबा, माहिती देतो" असे आश्वासन देत वेळकाढूपणा करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.
राज्य माहिती आयोगाच्या आदेशानंतरही माहिती न देणे ही अत्यंत गंभीर बाब असून, संबंधित अधिकाऱ्यांकडून आयोगाच्या आदेशाचे उघड उल्लंघन होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच अर्जदारास तात्काळ माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.
राज्य माहिती आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्यास सामान्य नागरिकांनी न्याय कुणाकडे मागायचा, असा सवालही यानिमित्ताने उपस्थित होत आहे.
आता आयोगाकडून आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होणार का, याकडे माहिती अधिकार कार्यकर्ते व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी गुरुवार 18 जून रोजी मतदान ; 452 मतदार बजावणार मतदानाचा हक्क

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड जिल्हा प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

नांदेड दि. 16 जून :- महाराष्ट्र विधान परिषद नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी तीन उमेदवार निवडणूक रिंगणात असून मतदानासाठी नांदेड जिल्ह्यातील महसूल उपविभागांच्या ठिकाणी एकूण आठ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

मतदान गुरूवार 18 जून 2026 रोजी सकाळी 8 ते दुपारी 4 यावेळेत होणार आहे. मतदानासाठी येताना मतदारांनी स्थानिक प्राधिकरणाकडून देण्यात आलेले ओळखपत्र अथवा भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या पुराव्यांपैकी एक पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे.
सदर निवडणुकीमध्ये एकूण 452 मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून त्यापैकी 224 स्त्री मतदार तर 228 पुरुष मतदार आहेत. या मतदारांमध्ये जिल्ह्यातील महानगरपालिकेचे सर्व सदस्य तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायतांचे अध्यक्ष आणि सदस्य यांचा समावेश आहे.
मतदान केंद्राचे ठिकाण व मतदान केंद्रात जोडण्यात आलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे नाव आणि मतदारांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

तहसील कार्यालय किनवट येथील मतदान केंद्रात किनवट नगरपरिषद-24, नगरपंचायत माहूर-17 असे एकूण 41 मतदार मतदानाचा हक्क बजावतील याप्रमाणे तहसील कार्यालय हदगाव या मतदान केंद्रावर नगरपरिषद हदगाव-23, नगरपंचायत हिमायतनगर-19 एकूण 42, तहसील कार्यालय भोकर येथील मतदान केंद्रात नगरपरिषद भोकर-25, नगरपरिषद मुदखेड-23 एकूण 48 मतदार, तहसील कार्यालय नांदेड येथील मतदान केंद्रात अर्धापूर नगरपंचायत-19, नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड-89 असे एकूण 108 मतदार मतदानाचा हक्क बजावतील.
तहसील कार्यालय कंधार येथील मतदान केंद्रात नगरपरिषद कंधार-23, नगरपरिषद लोहा-23 असे एकूण 46 मतदार तर तहसील कार्यालय धर्माबाद येथील मतदान केंद्रात नगरपरिषद धर्माबाद-25, नगरपरिषद उमरी-23 एकूण 48 तर तहसील कार्यालय बिलोली येथील मतदान केंद्रात नगरपंचायत नायगाव-19, नगरपरिषद बिलोली 23, नगरपरिषद कुंडलवाडी-23 असे एकूण 65 तर तहसील कार्यालय देगलूर येथील मतदान केंद्रात नगरपरिषद देगलूर-31, नगरपरिषद मुखेड-23 असे एकूण 54 मतदार आहेत. याप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील एकुण 452 मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील.
त्यानंतर सोमवार दिनांक 22/06/2026 रोजी सकाळी 08.00 वाजता या निवडणुकीची मतमोजणी कॅबिनेट हॉल नियोजन भवन तळमजला जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे होणार आहे. तरी या कामाची उच्चस्तरीय चौकशी लावून लवकरात लवकर काम पूर्ण करून देण्याची मागणी ग्रामस्थातून होत आहे.

# पीएमश्री जिल्हा परिषद मुलीचे हायस्कूलमध्ये शाळा प्रवेशोत्सव उत्साहात पहिल्याच दिवशी 90 टक्के विद्यार्थी उपस्थित

## शैक्षणिक गुढी उभारून 'शाळा प्रवेशोत्सव' साजरा; पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीत 48 विद्यार्थ्यांचे प्रवेश

दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क
संजय यलमवाड

*मुखेड, 7 जून 2026* – शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल मुलीचे, मुखेड येथे विद्यार्थ्यांची तब्बल 90% उपस्थिती नोंदवली गेली. 'शाळा प्रवेशोत्सव' आणि 'पहिले पाऊल' या उपक्रमांतर्गत शैक्षणिक गुढी उभारून विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

*शैक्षणिक गुढीचे पूजन करून उद्घाटन* शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष *संजय यलमवाड*, मुख्याध्यापक *एस. बी. राजपूत*, केंद्रप्रमुख तथा शिक्षण विस्तार अधिकारी *यु. पी. चव्हाण* आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख *दिलीप देवकाबळे* शिवाजी गेडेवाड यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून शैक्षणिक गुढी उभारण्यात आली. यावेळी 'पहिले पाऊल' या





उपक्रमाचे उत्साहात उद्घाटन झाले. शाळेच्या वेळेत सर्व विद्यार्थी गणवेशात हजर होते. मुखेड शहरातून शाळेपर्यंत प्रवेश दिंडी काढण्यात आली. बालवाडी वर्गात प्रवेश घेण्यासाठी पालकांसह चिमुकल्यांचा मोठा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.
*पहिल्याच दिवशी 48 प्रवेश*
मुख्याध्यापक राजपूत यांनी सांगितले की, पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीत 48 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. शिक्षक-शिक्षिकाही गणवेशात उपस्थित होत्या.

*शिक्षकांचे योगदान*
कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बरकतुल्ला, व्ही. एस. जाधव, बी. आर. मुद्देवाड, अंकाडे, सौ. लोणीकर, श्रीमती आशालता स्वामी, अश्विनी कुलकर्णी, व्यंकटी केंद्रे, सुधीर श्रृंगारे, चंद्रकांत डावकरे, भवानीसिंह चौहाण, सय्यद अकबर, जीवन वडजे, ए. डी. देशमुख, हरी भालेराव, पंढरी भालेराव, सौ. रेखा दिनकर, सुनीता पाटील, दीपाली बारहत्ते, संगीता माळगे, सरस्वती मुपडे, संगीता धनशेट्टी, सौ. येवतीकर, अश्विनी देशपाडे, सौ. कदम,ए. के. जाधव, सौ. साळुंखे आदी शिक्षक-शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले.
*डॉ. श्रावण रॅपणवाड यांच्याकडून पंखा भेट* शाळेच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस *डॉ. श्रावण रॅपणवाड* यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी इयत्ता पहिलीच्या वर्गासाठी छताचा पंखा भेट दिला.

या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा *सौ. वेणूताई रॅपणवाड*, सदस्य *माधुरी इगोले पाटील*, *भीमराव बनसोडे*, *नितीन तलवारे* आदी उपस्थित होते.

'पीएमश्री' योजनेअंतर्गत विकसित होत असलेल्या या शाळेत पहिल्याच दिवशी दिसलेला विद्यार्थी व पालकांचा उत्साह संपूर्ण तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)